म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९५७३
११।१९६२

# साधना

प्रातिनिधिक काव्यसंग्रह



REFBK-0012758
REFBK-0012758

M. PATHAK

साहित्य साधना मंडळ,
भुसावळ
★
१९६२

सन १९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२६९२५ दि: ३।७५
क्रमांक १५५०२ नों दि ११।५८

# साधना

[ प्रातिनिधीक काव्यसंग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२०५८
REFBK-0012758
REFBK-0012758

संपादन : साहित्य साधना मंडळ, भुसावळ

:: प्रकाशक ::
श्री. मधुकर श्री. पाठक,
प्रमुख कार्यवाह,
साहित्य साधना मंडळ, भुसावळ.
जिल्हा जळगांव

★

किंमत १ रुपया

प्रथम आवृत्ति १९६२.

★

※ साहित्य साधना मंडळ ※

( कार्यकारी समिति )

१ श्री. मधुकर श्री. पाठक
२ ,, वि. भा. नेमाडे
३ सरला भोळे
४ श्री. दिनकर साळशिंगीकर
५ ,, का. श्री. करमरकर
६ ,, गंगाधर सावळकर
७ ,, निलनकुमार तडवी
८ ,, दिवाकर नेमाडे

:: मुद्रक ::
स. भु. पाटील
जनशक्ति प्रिंटिंग प्रेस,
२००, नवी पेठ, जळगांव.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33६९५ दि: ...
क्रमांक १५७३ नों: दि: ...

# प्रास्ताविक....

भुसावळ येथील साहित्य साधना मंडळानें हा लहानसा काव्यसंग्रह प्रसिद्ध करून कवितेविषयीं आपली आस्था आणि भक्ति दाखविली आहे. या सत् प्रयत्नाबद्दल मंडळाचे अभिनंदन करावयास हवें.

संग्रहाच्या आरंभी पाहुणे कवींच्या चार कविता आहेत. नंतर मंडळाच्या कार्यकारी समितीच्या सदस्य कवींच्या कविता असून शेवटील विभागांत नवोदित कवींच्या कविता संकलित आहेत. नवोदित कवींचे तीन अपवाद सोडल्यास प्रत्येक कवीची एकेक कविता घेतली आहे. यामुळें पुष्कळ कवींचा संग्रहांत समावेश झाला आहे.

पाहुणे कवींच्या कवितांबद्दल कांही सांगावयास नको. मंडळाचे सदस्य कवि आणि नवोदित कवि हे वस्तुतः एकाच श्रेणीमधले. तथापि नवोदितांचा पृथक् विभाग मानण्यांत मंडळाचा व्यावहारिक हेतु दिसतो. कारण नवोदित कवीं पैकीं प्रथम पांच कवींना मंडळाकडून पुरस्कार देण्यांत आला आहे असें समजतें. परंतु आता या कवितांचा विचार करतांना मंडळाचे सदस्य आणि इतर कवी यांकडे मी नवोदित कवी म्हणून एकाच दृष्टीनें पहाणार आहे.

आपल्या कवितांना मुद्रणाचा संस्कार घडविण्यात या कवींचा हेतु प्रसिद्धि मिळावी हा नसून उत्तेजन मिळावें

एवढाच हेतु आहे. होतकरू कवींना उत्तेजन पाहिजे असतें. उत्तेजनाच्या अभावीं कितीतरी संभाव्य मराठी सत्कवींच्या कवित्वाचा बीमोड झाला असेल! केशवसुतांसारख्या थोर कवीलासुद्धां "द्या उत्तेजन हो कवीस...." असें मागणें मागावें लागलें.

प्रस्तुत कविता म्हणजे कांहीं उत्साही तरुणांची आरंभिक काव्य साधना. तेव्हां त्या कवितांमध्यें काय नाहीं तें पहाण्यापेक्षां, काय आहे तें पहावें हे मला योग्य वाटतें.

या कवितांवर दृष्टि फिरवतांना कांही काव्यगुणांचा सहज आळ होतो. कविताहि विविध आहेत. त्यांत नव्या 'पंखांची फडफड आहे.

"उद्दाम झालों मी नव्यानें...."

"नाहीं पुरायची तुला
उब आईच्या पंखांची...."

अशा ओळींत त्यांची त्वरा जाणवते. विचारांचे आणि भावनांचे तरंग कवींनी उठवले आहेत. त्यांत ध्येयवाद ("अश्रु ढाळतो," "कसे" इ.), चिंतन ("भारत नाट्य," "दीप मनिंचे." इ.), भक्ति ("कृपाछत्र," "समर्पण" इ.), निसर्ग ("रंगधनु," "श्रावण," विसावल्या सरी." इ.), असे अनेक रंग आहेत. परंतु निम्म्याहून अधिक कवितांचा रंग प्रणयाचा आहे. आणि तें स्वाभाविकच. प्रणयरंगाच्याहि विविध छटा कवींनी दर्शविल्या आहेत. नर्म-विनोद ("माझा

थोडासा खट्याळपणा." ), औत्सुक्य ( " ओढ " ), विरह ( " मेघदूता " ) आकर्षण ( " रूपगंधा " ) हे त्या प्रणयाचे पैलू दिसून येतात.

" तुला भेटावया यावेसें वाटे
" ऋतूऋतूंचे लावून पंख "

* * * *

" ओल्या मातीवर आतां
अधीर पाउलांचे ठसे "

अशा ओळी भावोत्कट वाटतात.

बहुतेक कवितांचा भाव साधा आणि आशय सरळ आहे. तेव्हां भाषा सुबोध असणार हें उघडच. परिचित आशयाचे शब्द वाचकाच्या परिचयाचे असतात. एका कवितेचीं भाषा तर ज्ञानेश्वराच्या काळाची वाटते ! ( " थेंबुटें " ) त्यामुळें विशेष चमत्कार वाटतो—

" हा आवघियांचा मेळावा कीं अमितपर्णाची धावा
हारितांचा भरला आवा गोमटेपणीं "

परंतु " लालसर कोवळया " ही कविता निराळी वाटते. तिच्या आविष्काराची ढब नवी आहे. इतर कांहीं कवितांतूनहि अशी नवी सरणी अधून मधून उमटलेली दिसते. " निळसर हेतु " " गाफिल गंध " " निळीं रेशमी स्वप्नें, " " मेळांचा

पाचोळा" असें वाचल्यावर "याचा अर्थ काय?" असें लगेच कोणी विचारतील. त्याचा नीट अर्थ कदाचित् सांगताच येणार नाहीं. येथें अविषयाशीं विसंबंध जोडला आहे आणि तर्काला चुकविलें आहे, तर शब्दार्थ लागणार कसा?

परंतु प्रत्येक शब्दाचा संपूर्ण अर्थबोध = कवितेचा बोध असें जें समीकरण सामान्यत: करण्यांत येतें किंवा समजलें जातें त्यातच कांहींतरी चुकत असावें. संपूर्ण शब्दार्थ लागला नाही तरी (किंवा न लागल्यानेंच) कवीचा प्रतिमार्थ आकलनांत येतो. सुसंबंध, तर्क यांची शुद्ध ठेऊन जर शब्द योजले तर शब्दार्थ तेवढा कळून कदाचित् कवीचा मनोगत आशय मात्र हुकेल. प्रसादामुळें काव्याशयाच्या आकलनास साह्य होते असा नियम सांगता येणार नाहीं. तेव्हां, "आतां प्रसादाला वाईट दिवस आले" अशी खंत करण्याचें कारण नाहीं. सगळे दिवस कुणालाच सारखे नसतात!

पूर्वी पंडित कवींच्या काळांत ओळीचा अन्वय आणि एका शब्दाचे अनेक अर्थ लावणें म्हणजे मोठें कठीण काम होतें. ती अवघड रचना आणि आजची तथाकथित दुर्बोधता यांत मौलिक भेद आहे. प्रदर्शन आणि दर्शन यातला तो भेद आहे. आजच्या दुर्बोधतेंत पांडित्यप्रदर्शनाचा संबंध नाहीं, तर आंतरिक आशय दर्शनाचा प्रश्न आहे. असो. शब्दांच्या नव्या मूल्यांकडे प्रस्तुत संग्रहातील कांही कवींचें लक्ष्य गेलेलें दिसतें. हें जर खरें असेल तर– इतर कोणास काहीं वाटो– मी तें सुचिन्ह समजेन.

"छंद", "रानांत रानांत" या कवितांचा मुद्दाम उल्लेख करावासा मला वाटतो.

"उन्मादतें पीस पीस....
हरवतें मीच तिथें....
साधीसुधी साडी माझी—
कशिद्याचा टांका रंगे"

यांतील विस्मृति आणि भ्रम भावरम्य आहे. "रानांत रानांत" यांतील गीत वाचकचित्तास झुलवीत नेतें—

"सांजल्या मनांत
जाणीव जागली
होऊन मोत्यांचा तुरा
क्षितिज–वाटेंत
सांडल्या चांदण्या
होऊन सोनफुलोरा...."

अशा या नवोदित कवींपासून बरीच आशा करतां येईल. कवींनी आपली काव्यसाधना अखंड चालवावी.

"प्रतिभा," २९ पंतवैद्यकॉलनी, इंदूर.
वैशाख वद्य ८ शके १८८४.
— रा. अ. काळेले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३३५९५ वि: ...
क्रमांक ... नों दि: ...

# निवेदन....

साहित्य साधना मंडळाद्वारें प्रकाशित होणारा "साधना" हा प्रातिनिधीक काव्यसंग्रह रसिक वाचकांपुढें ठेवतांना आनंद होत आहे. साहित्य साधना मंडळानें गेली सात वर्षे साहित्याची जी अल्पस्वल्प सेवा केली आहे तिचेंच दृश्य फळ "साधना" काव्यसंग्रहाद्वारें मूर्त स्वरुपांत दिसत आहे.

'साधना' हा प्रातिनिधीक काव्यसंग्रह आहे. अखिल महाराष्ट्रांतून बहुसंख्येनें नवोदित कवींनी यांत भाग घेतला. परंतु संग्रहाबाबत एक विशिष्ट मर्यादा रेषा मंडळानें आखून घेतल्यामुळें इच्छा असूनहि कांहीं कविमित्रांचा नाइलाजानें विरस करावा लागला.

"साधना" काव्यसंग्रह काव्यगुणांच्या दृष्टीनें कुठल्या दर्जाचा आहे हें रसिकांनीच ठरवावयाचें आहें. नवोदित कवींची साधनाच या संग्रहांत एकत्रित केली आहे. यांत प्रथितयश कवींची सफाईदार अभिव्यक्ति नसली तरी पुढें पाऊल टाकण्याची दुर्दम्य मनिषा मात्र जरूर आहे.

या काव्यसंग्रहांत तीन विभाग आहेत. पहिल्या विभागांत कांहीं प्रथितयश कवींच्या कविता आहेत. काव्यसंग्रहाचा दर्जा वाढावा म्हणूनच हा उपक्रम केला आहे. श्री. वि. म. कुळकर्णी, श्री. रा. अ. काळेले, श्री. प्रफुल्लदत्त व श्री. के. नारखेडे या कवींनी आपल्या कविता पाठवून आम्हास उपकृत केलें आहें. त्याबद्दल मंडळ त्यांचे अतिशय आभारी आहे.

दुसऱ्या विभागांत मंडळांतील कवि सदस्यांच्या कविता आहेत.

तिसरा विभाग हा स्पर्धा विभाग आहे. 'साधना' काव्यसंग्रहांतर्गतच स्पर्धाहि जाहीर केली होती. ती सर्व कवींना खुली ठेवण्यांत आली होती. तिचा निर्णयहि येथें जाहीर करतांना आनंद होत आहे.

प्रथम क्रमांकास अनुरुप अशी एकहि कविता न आल्यामुळें तें बक्षीस एकूण पांच कवींना समप्रमाणांत विभागून देण्यांत आले आहे. पुढील कविमित्रांना तें बक्षीस प्रत्येकीं पाच रुपये याप्रमाणें देण्यांत आले आहें.

१] श्री. पद्माकर सराफ — "कशी मारूं भरारी"
२] शैला फडणवीस — "धन्य धन्य जाहले"
३] श्री. सालोमन लुथर — "कृतज्ञ"
४] श्री. पद्माकर वैद्य — "ओढ"
५] श्री. श्री. पुं. पिंपळे — "अवेळी"

बक्षीसास पात्र ठरणाऱ्या कवींचें हार्दिक अभिनंदन!

इतर सर्व कवींच्या सहकार्याचेहि मोल विशेष आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच 'साधना' आज दृश्य स्वरूपांत दिसत आहे. संग्रहांतील सर्व कवींना धन्यवाद!

साहित्य प्रांतांत पदार्पण करण्याचा साहित्य साधना मंडळाचा हा प्रथमच प्रयत्न आहे. त्यातील उणीवांची आम्हास जाणीव आहे. पण पहिलें पाऊल या दृष्टीनें रसिकवाचकांनी उदार मनानें क्षमा करावी.

आमच्या विनंतीस मान देऊन श्री. रा. अ. काळेले यांनी वेळांत वेळ काढून या संग्रहास जे प्रास्ताविक लिहून दिले त्याबद्दल मंडळ त्यांचे ऋणी राहील. तसेंच संग्रहाच्या सुबक छपाईची जबाबदारी स्वीकारून श्री. स. मु. पाटील यांनी अल्पावधीत हे पुस्तक तयार करून दिले याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

'साधना' मध्यें पारिजातकाच्या फुलांचा सुगंध आणि मार्दव नसेल, पण ह्यामध्यें असलेलें समिधांचें पावित्र्य रसिक वाचकांना आढळून आले तरी आमची साधना सफल झाली असें म्हणता येईल!

—संपादन समिति
'साहित्य साधना मंडळ' भुसावळ.

# विभाग पहिला.

—० पाहुणे कवि ०—

* श्री. वि. म. कुळकर्णी

* श्री. रा. अ. काळेले

* श्री. प्रफुल्लदत्त

* श्री. के. नारखेडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 33595 वि:
क्रमांक नों. दि:

## १ : धुवांधार

…ग्रंथसंग्रहालय ठाणे
९२७५८

धुवांधार पाणी सोंडेने फेकून
'हस्त' परवांच गेला मिरवून!
फुलले डोंगर - फुलल्या कपारी,
बगळयांची रांग तळ्याच्या किनारीं.

ओढ्या ओहोळांना निर्मळ पाणी
पिके दाटीवाटी उभी रानांतुनी,
ढग उंचाहून भरल्या दुपारीं
देवाच्या दारची चवरी वारी.

शिवारीं दाटला गच्च भुईमूग
तुरींनी माळला पिवळा रंग,
सिताफळीं, पेरू लवले फळांनी
गुलाब, शेवंती आल्या बहरूनी.

—'मृग' मुठीं मुठीं गेला निरवून
तेंच ओटीपोटीं आलें अमळून
इंद्रा–वरुणाची लेक आवडती
माहेराला आली, आली 'वसुमती'.

—सारें भोवतीचें इथेंच सोडून
वाटे उंच जावे डोंगरावरती
तेथून पृथ्वीला घालावी साद
'अगे माझे माये! प्रेमळ धरती!

अगे माझे माये! प्रेमळ धरती
तुझी ओटी आज फुलली पुरती;
समज मजला तुझा अेक लेक...
आणि घे मला ही पदराखालती!
पिऊन तुझें तें अमृतस्तन्य
फुटूं दे नसांत हिरवे चैतन्य;
फुलेन, झुलेन, झडेन अंती
माझा देह, माय, तुझीच माती.'

—वि. म. कुळकर्णी

## २ : पिवळें...

बिनरंगाच्या घरास माझ्या
रंग दिला हा पिवळा कोणी ?

विटक्या विटभिंतीला पिवळी
अविट कळा तरि कळे कुठोनी ?

फटीफटीतुन भरले कोणी
रंगित पिवळे संगित धागे ?

मनकोन्यांतहि सहजीं माझ्या
काहीसें पिवळें हो जागें

खिडकीच्या भानास शिवे का
हळुं चाहुल पिवळी लयकारी ?

कोण उडवतें अंगणात ही
हर्षाची पिवळी पिचकारी ?

ही गीताची लकेर पिवळी
पानांच्या कानीं कां पडली ?

हळुंच पायरीवरी कुणाचीं
सोन पावलें पिवळीं चढलीं ?

कुणी टाकली माझ्यावरती
सोन्याची शृंगारिक चूळ ?

अवचित आलें माझ्या पिवळें—
उंबऱ्यास का उंबरफूल ?

कोमल कोऱ्या कोमट गोऱ्या
हळद लाउनी पिवळी अंगा
दार उघडुनी येणारी तूं
नरम उन्हाची नार सुरंगा...

—रा. अ. काळेले

## ३ : चिन्तनिकेचीं पानें

आजकालची नच, माझी चाल तपाची
घडिभरहि न छाया जेथ लता-विटपांची
रुद्राक्ष न कंठी, शिरिं न जटा संभार
सा ध ना दिखाऊ माझ्या ती न जपाची.

❀ * *

सम्राट क्षितीचा मी, मम तख्त धनांचें
गुरुतेस निळेपण माझ्या अस्मानाचें
दासीपरि जवळि न छाया, छे ! न अहंता
मज मिळे निरंतर समाधान दानाचें.

* * *

कष्टांत सरावे असे प्रहर दिवसाचे
ओंजळींत माझ्या भाग्य नको नवसाचे
योजना तपाची हवी कर्मसिद्धीस
रसनेस त्याविना मोल न ये तीर्थांचें

* * *

उरलें न दुजेपण आपल्यांत "मी-तूं" चें
साफल्य जाहलें जागविल्या हेतूचे
जा दिगंत स्पर्शित दूर कुठेहि पयोदा
धरतीपरि पेलिन मी शिरिं चक्र ऋतूंचें

* * *

मम मौन चितारी चिन्तनिकेचीं पानें
आस्वादिल आशय ज्यांतील जग अभिमानें
सांकली गहनता उरी या सजल घनांची
मी भारिन क्षितीजें मनामनांची दानें !

—श्री. प्रफुल्लदत्त

## ४ : काळजाचा तुकडा

पाहुनी भान हरपतें— शेत हें
पाहुनी मन हरखतें

घामानें शिंपुनि मळा
पेरतो कधीं जोंधळा
मोत्यांची खुलते कळा
तें अन्नब्रह्म वितरतें.

जंव फुटे कपाशी, किती
चांदण्या गोड हांसती !
मृदु वाऱ्यावर नाचतीं,
आकाश इथें उतरतें.

भुइमुगा बहर येतसे
गालिचा पसरला दिसे,
वरि सोनफुलांचे ठसे
खुलनिया गोड हांसतें.

अन् पीक काढल्यावर
मी फिरवुनिया नांगर
करि तयार जों वावर
ताटीच साफ वाटते.

जणु अंथरलें कांबळ
वाटले दिसे मोहळ
पसरले जसे काजळ,
काळोख थिजे जणुं इथें.

पाऊस सरसरा पडे,
प्रभु वरुण घालतो सडे,
मखमाल उठे चहुंकडे,
ती शिवारास खुलविते

हें शिवार माझें असें
करुं मोल तयाचे कसें ?
जग उणे त्यापुढे दिसे
मम काळिज-तुकडाच तें !

—के. नारखेडे

# विभाग दुसरा.

## -: मंडळाचे सभासद कवि :-

* श्री. मधुकर श्री. पाठक
* श्री. वि. भा. नेमाडे
* सरला भोळे
* श्री. दिनकर साळशिंगीकर
* श्री. का. श्री. करमरकर
* श्री. गं. श्री. सावळकर
* श्री. निलनकुमार तडवी

## ५ : येथ झुकती चंद्र सूर्य

आज माझ्या भावनांना तारकांचें तेज आहें
मुक्त माझ्या कल्पनांना पांखरांचे पंख आहे
शब्द माझे नादती नाण्याप्रमाणें आजला
कार्य माझें वाढलें अन् शब्द माझा गाजला !

काळ रात्रीं संपल्या नि तिमीर अवघा पांगला
मार्ग पुढचा कापण्यास्तव चीरकांक्षा आजला
आज रक्ताला कृतिची चटक आहे लागली
क्षितिज रेखा वाढली अन् ध्येय तृष्णा लागली.

आज माझ्या भावनांना चंद्रिकेचें तेज आहें.
तृत माझ्या जीवनाला भव्यतेचें ओज आहें
बंधनांचे सर्प जहरि निष्प्राण झाले आजला
शृंखलांचे पाश तुटले मुक्त आत्मा जाहला.

वेदना त्या सणकणाऱ्या बोचणारें शल्यहि
लोपले सारेंच आतां, पचविले मी वीषहि
—उद्दाम झालों मी नव्यानें; नविन क्षितिजें भोवती
शक्ति अंगी मुक्तिसाठीं रक्ति माझ्या नाचते.

मारीन जेथें लाथ मी काढीन पाणी तेथुनि
झेळला जाईल तेथें टाकीन जेथें शब्द मी
भव्यता आहे समोरी दिव्यता ये जीवनीं
समर अवघे संपलें निःशांत माझ्या जीवनीं !

आज माझ्या भावनांना पांखरांचे पंख आहे
आज माझ्या कल्पनांना तारकांचें तेज आहे
येथ झुकती चंद्र सूर्य नभहि झाले ठेंगणे
वायुवरती बैसुनि मी आज घाली रिंगणे !

—मधुकर श्री. पाठक

६ : श्रावण

व्याकुळलेला विरही श्रावण
ओढ अनामिक घेऊन येतो
आतुरतेचे निळसर हेतूं
निर्लेपणांतच गुंफु लागतो.

अनामिकेचें हिरवे हितगुज
कणांकणांना सांगत सुटतो,
उन्मनलेल्या क्षणाक्षणांना
मंत्र अनोखा ओढ लावतो.

मौनामधल्या प्राजक्ताला
ओले चुंबुन बहर आणतो,
धुंद क्षणांची धुंद आसवे
अधर फुलांनी टिपून घेतो.

आषाढाच्या सुख स्वप्नांना
अनुबंधांचें बंध बांधतो,
कादंबिनिच्या नयनांमधलें
अनुभूतीनें काव्य जाणतो.

अधीरलेल्या चिर विरहाला
चंद्रकरांनी मिठी घालतो
ऋतुराणीचा प्रियकर होऊन
श्रावण भूवर स्वर्ग आणतो.

—वि. भा. नेमाडे

## ७ : छंद

असा रंगतो रे खेळ
जसा वारा घाली पिंगा,
अचपळ मनाचा या
वाऱ्यावरीं उडे भुंगा.

प्रतिभेच्या पांखराचें
उन्मादते पीस पीस,
पंखामध्यें भरे वारा
पायतळीं नुरे धरा.

भरारतां हवेमध्यें
उमटती रेषा रेषा...
रंगविते खुळे मन
त्याच रेषा जशा-तशा.

उन्मादल्या क्षणामध्यें
उमटती रंग रेषा...
हरवते मीच तिथे,
प्रकाशांत नुरे उषा

लागलेला हाच छंद,
हाच माझा खेळ रंगे...
साधी सुधी साडी माझी
कशिद्याचा टांका रंगे.

—सरला भोळे

## ८ : लालसर कोवळ्या

लालसर कोवळ्या पानांची
पिंपळ फांदी...
उजाड माळावर जगूं पाहते
जीवन मृत्यूच्या उन-सावलींत...
( फिनिक्स पक्ष्याच्या जन्मकथेचें आवर्त
सभोंती आहे,
दर्द दिवाण्या मीरेच्या गर्व्यानें उठलेलें. )
...सरता ओलगंध मातीचा गातो आहे
पिचल्या स्वरांत श्रावण सरींचें झिमझिम गीत.
( त्याचेंहि प्राण व्याकुळलेलें. )

...परंतू धुंद आहे अेक कावळा
वैशाखांतिल विवस्त्र आकाशांत घिरटणारा,
वेद-पुराणे रिचवून
सोमरसानें न्हालेला...
क्षितीज छेदणाऱ्या नजरेचें
गौरवगीत गाणारा......

—दिनकर साळशिंगीकर

घटाकार आकारूं अेक स्तंभाचिये आधारू
क्षमेचिये ऋण निवारू छाया करीं.

प्रकाशाचिये सांगाती अंधारे कैली वसती
जन साउली बोलती त्या लागी.

ध्वान्ताचें धान्तपण उणे प्रकाशाचें प्रकाशत्व न गणे
तोषायासी बहुगुणें राहिलें ते.

हा अवयियांचा मेळावा कीं, अमितपर्णांची द्यावा
हारितांचा भरला आवा गोमटेपणीं.

कीं, पांचूचें उभे 'थेंबुटे' शिखिचिये विजिन प्रगटे
गंधाचिये गर्भपुटे आन्दोळें.

—का. श्री. करमरकर

## १०  : ढळते जेव्हां रात्र चांदणी

ढळते जेव्हां रात्र चांदणीं
स्वप्नहि ढळते आकाशाचें...
स्वप्नमंजरी उदास हंसते...
बंध उकलतां मधु–मधुपाचें.

पापणींतली रेखीव चित्रें
धूसर बनती प्राचि रंगतां
निळ्या रेशमी स्वप्नामधुनीं
धागे गळती प्रकाश खिरतां.

ढळते जेव्हां रात्र चांदणी
स्मृति हांसते उदासलेली...
'नको जागृति, रात्र उरावी
धुंदि चढावी स्वप्नामधलीं.'

—गं. श्री. सावळकर

## ११ : किमया

काळोखांतिल भेसुर छाया
कडवटतेंनें भिवविति मजला,
वाटे वरचा वाटसरुं मी...
विचलित होई क्षणा क्षणाला

परंतु दिसतां तुझिया हातीं
ध्रुवापरी तो दीप युगाचा
मनांत माझ्या रात्र उजळतें
दिसूं लागतो मार्ग उद्याचा.

—निलनकुमार तडवी

# विभाग तिसरा

## * स्पर्धा विभाग *

प्रथम पांच कविता पारितोषिक पात्र.

माझ्यां नाजुक पंखांना
सांगे आकाश वाकून,
'मार भरारी पांखरा;
राहूं नको विसंबून.

'नको ठेवूंस मनांत
वेडी घरट्याची माया;
नशिबाचे वृक्ष तुला
पुढें देतील रे छाया.

'आतां पिकल्या सुगीला
नको होऊस पारखा...
दु:ख मृदूल पंखाचें
नको सांगूस सारखा.

'नाहीं पुरायची तुला
ऊब आईच्या पंखाची,
आहे पुढती थांबली
तुझी सोबत उद्याची......
तुझी सोबत उद्याची.'

—पद्माकर सराफ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] दि: [illegible]
क्रमांक [illegible] नों दि [illegible]

# ३ : कृतघ्न

मी कृतघ्न मानव–देवा
कधीं न तुज ओळखलें.

तूं तर होता कुसुमकळ्यांतुन,
मृग कस्तुरी सम नाभींतुन,
हांसत विहरत धुन्द जुईंतुन,
श्रावण भिजल्या मृद्गंधांतुन
प्रीतिचें तुझिया सौरभ
अणूं अणूंतुन फुललें.

नीलगिरीच्या शिखरांवरती,
हिमनगाच्या स्फटिकांवरती,
कधीं कुहरीं, परमाणुंवरति,
ओल प्यायल्या मातीवरती
तुझें उमटलें होतें पाऊल
अंध, न मज तें आकळलें.

## २ : धन्य धन्य जाहलें

भास जाहला खरा स्वप्न सत्य जाहलें
आज मी खरोखरी धन्य धन्य जाहलें.

तेंच वदन हांसरें तीच मूर्त सांवळीं
तीच हनू, जिच्यामधीं विसावली असे खळी.

त्याच नाचऱ्या बटा तेंच कृष्ण कुंतल
तिळ साज गालींचा...गालब्रोट शोभलं.

तेंच नयन ज्यांत की भावमधूर सांचलें
तेंच अधर ज्यांत की खट्याळ हास्य दाटलें.

तीच मृदुल मिठी, जिने नंदराणी तोषली
ब्रम्हरूप पाहुनी मनोमनी सहर्षिली.

तेंच ब्रम्ह सानुलें रूप धरून आगळे
आज सदनीं पातलें धन्य धन्य जाहलें.

—शैला फडणवीस

## : कृतघ्न

मी कृतघ्न मानव—देवा
कधीं न तुज ओळखलें.

तूं तर होता कुसुमकळ्यांतुन,
मृग कस्तुरी सम नाभींतुन,
हांसत विहरत धुन्द जुईंतुन,
श्रावण भिजल्या मृद्‌गंधांतुन
प्रीतिचें तुझिया सौरभ
अणूं अणूंतुन फुललें.

नीलगिरीच्या शिखरांवरती,
हिमनगाच्या स्फटिकांवरती,
कधीं कुहरीं, परमाणुंवरति,
ओल प्यायल्या मातीवरती
तुझें उमटलें होतें पाऊल
अंध, न मज तें आकळलें.

अरुणांसह तूं होता हांसत
दंव ओल्या नभदूर धुक्यांत,
कधि संध्येसह क्षितिजी विलसत,
रजत सरींतुन झरझर बरसत,
कलाहीन मी, मज न परि
रेखा रंग कधी दिसलें.

लवलवणाऱ्या तृणपात्यांतुन,
झुळझुळणाऱ्या नीलझऱ्यांतुन,
भरतीच्या अन् फेनिलतेंतुन,
तळ–सागरिच्या मुक शिम्पांतुन
तुझीच होती चीर-चेतना, हळूं भावाना
तुझ्याच श्वासे आहे ना रे विश्व उमललें?

मज आकळलें, सारें कळलें...
तरी तुझ्या पूजेस्तव देवा
मी सानपुष्प नाहीं अर्पिलें...
मी कृतघ्न मानव देवा
कधी न तुज ओळखलें.

—सालोमन लुथर मानमोठे

४ : ओढ

आहे जाणीव जराशी आहे जरासा उमाळा
तुझ्या स्पंदना मधून आहे अजुन जिव्हाळा

आहे अजुन दिलासा आहे अजून उसासा
आणि उगीचच कसा जीव होतो वेडापिसा

तुझ्या गुढ अंतराचा थांग लागतच नाहीं;
तुझ्या मूक बोलण्याचा अर्थ कळतच नाहीं.

ओढ दाटतें मनांत अन् होतो कासावीस,
पंख तुटल्या पक्षाची दीन अवस्था उदास.

मीच माझिया मनाला किती समजावूं आतां
कधी संपणार आहे माझ्या अंतरीची व्यथा.

हवी अधिक जाणीव आहे त्याहुन जराशी...
भर वादळांत कशी नांव लागावी कांठाशी ?

—पद्माकर वैद्य

आज अवेळीच कसे
अबोलीला फूल आले
भाव वेड्या मुग्धतेला
अवचित उधान आले

आज अवेळीच कसा
प्राजक्तहि मोहोरला
गंधवेड्या जाणीवेला
भ्रमांत विसर पडला

भाववीणा झंकारली
कंप शब्दांना भरला
दूर खोल गाभाऱ्यांत
नादब्रह्म सुखावला

—श्री. पुं. पिंपळे

## : रानांत रानांत

रानांत रानांत
जांभूळ बनांत
झडली श्रावण गाणीं.

गंधल्या मातींत
पूनव उजट
अंकुरे लाख वितानीं.

नागड्या झाडांना
लखडे पालवी
स्वप्निल होउन धूंद.

पांगल्या नभांत
दाटला दर्वळ
ओठांत रुतलें छंद.

सांजल्या मनांत
जाणीव जागली
होउन मोत्यांचा तुरा.

क्षितिज वाटेंत
सांडल्या चांदण्या
होउन सोनफुलोरा.

—ना. धो. महानोर

## ७ : रुप-गंधा

नाक तुझे चाफेकळी,
काया तुझी जास्वंदी;
गोऱ्या नाजुक पायलीं
छुम छुम स्वरधूंदी.

रंगरुप उर्वशीचें
तुझ्या रूपांत थिजलें;
तुझ्या कायेत केतकी
गंध गुलाबी भिजलें.

अजिंठ्याची रूपगंधा
रस चांदणीचा व्याली;
आकाशीची रूपगंगा
लेणे सप्तरंगी ल्याली.

—मुरलीधर पवार

## : तेव्हां तूं काय करतेस ?

माझा थोडासा खट्याळपणा
तूं झिडकारुन टाकतेस :

पण निसर्गाची ती पोरं
रोज तुझ्या जातात वाटेस
तेव्हां तूं काय करतेस ?
मऊ मुलायम पश्चिमवारा
तुझ्या पदराशीं खेळ खेळतो,
खोचलांस तूं, तरी चिडवाया
पुन्हां पुन्हां ओढतो : तेव्हां तूं काय करतेस ?

काळ्याभोर घन आवरणीं
जसा चंद्रमा येतो खुलुनी......
तसा तुझा खोपा खुलविण्यास
जातेस तूं फुलं शोधण्यास......
पण लबाड कळ्या
गवसणी घालतात तुझ्या पदरांस :
: तेव्हां तूं काय करतेस ?

निद्रा देवीच्या मांडीवरती
जेव्हां तूं पहुडलेली असतेस
तेव्हां तुझी झोप......
ती खट्याळ स्वप्न चाळपतात
: तेव्हां तूं काय करतेस ?

भावजलाच्या स्वच्छ पटावर
जेव्हां तूं स्मृतिच्या कुंचल्यानें
सुंदर स्वप्नें रेखित असतेस......
तेव्हां ती खट्याळ ' विस्मृति '
सारी चित्रें पुसून टाकते :
: तेव्हां तूं काय करतेस ?

—अ. रा. मराठे

## : मानस् व्यथा

सतेजांत नसे तेज
तेजाचीहि काळी पाठ;
सौम्य चंद्रा नाहीं ओज...
पाठीवरी छाया दाट.

मूर्तालाहि अमूर्त कांहीं
अेक व्यथाच महान...
जन्मालाही मरणाचें
अेक दरिद्री वाण...

—रविंद्र.

दूर द्राक्षाच्या मळ्यांत
कोण घालितो हाकारा,
भरलेल्या आवाजानं
शहारते ओली धरा

पिके भरघोस आली,...
दृष्टी लोभावली फळा
हिवँळीचा धूंद वास...
पांखरांना फुटे गळा.

पांखरांची किलबिल
पाणी दांडांत मावेना...
ओढ लागते ओढाया
वारा पंखांत ठरेना.

ओल्या मातीवर आतां
अधीर पावलांचे ठसे...
आला भरा द्राक्षमळा
कुंपणाला नशा रूते.

—मीना पळसुले

## : सोबत

टिचभर खळगीला
अन्न हवे घांसभर
आणि उघड्या देहाला
वस्त्र हवे अंगभर.

ऊन पावसाची भिती,
थंडी नको वाजायला...
असे शेणाचें घरटे
हवे आहे राहायला.

अशा शेणाच्या घरांत
हवी मातीचीच चूल,
किलबिल करणारे
हवे सानुलेसे फुल.

अितुकीच इच्छा देवा!
नाही भांडार मागत...
फक्त एकच मागतो
देई घरांत सोबत.

—पद्माकर सराफ

## १२ : विसावल्या सरी

विसावल्या सरी सरला आषाढ
लागली सृष्टीला श्रावणाची ओढ.

नेसून हिरवी साडी भरजरी
नटून ही आली वसुधा सामोरी.

इन्द्रधनूचें हें बांधून कंकण
श्रावण येतसे अधीर होऊन.

सृष्टीचें आगळे वैभव पाहून
श्रावण बिचारा गेला वेडावून.

ओतीत वसुधा मोतियाच्या राशी
बोलावी हळूंच श्रावणा जराशी.

आल्या जलधारा फिटले अंतर
जाहले मीलन इंद्रधनूवर.

—पद्माकर वैद्य

करुणामूर्ती भवभूतीनें अशी विभूती
नाहीं शिल्पिली उत्तर रामचरितीं...
उदात्ततेचा मानदंड हा
कविकुलगुरूनें नाहीं निर्मिला रघुवंशांमध्यें
नियतीचा नाट्यकार परी निर्मून गेला...

: अथांग नायक :

भारत नाट्यीं पहा...
थिबा थिजतसे थडग्यामध्यें...
गजाआडच्या रत्नागिरीच्या
रत्नागिरीचें रत्न उजळते
मठीस तेव्हां मंडालेच्या...
थिबास जडली वाचाबंदी
ब्रम्हलोकीं परि स्फुरली वाणी भगवंताची,
तो अेक दिवस तपोवनीं त्या मेघाळून ये...
वृत्ति अन्यथा झाली.
आठवणीच्या चुकचुकल्या पाली
त्याच क्षणाला पुण्यदेशच्या पवनानें
हळूंच पाहिलें झुळूकेच्या नजरेनें :
:: गीतेंमधला कर्मयोग जणूं समूर्त बसला...

करीं लेखणीं सौदामिनीची.

( नभःपटावर अक्षरलेली )

पवन मनीं गहिवरला : बाष्पस्वनीं गदगदला...
: तुझी सांवली हुरहुरूनी, लागुन झुरणी
सोडून गेली आज तुला रे तुझी आत्मिनी !
कृतांत नेत्रीं डबडबलें पाणीं...
प्रशांतता त्या हिमालयावर, परि अंतरी

पाझरल्या गंगा यमुना.

आवरतां हुंकार प्रगटला अधर तटांतुन,
हुंकारांतुन झंकारत ये मांद्र घोष तो...
" नैनं छिन्दति शस्त्रानि, नैनं दहति पावको..."
" गतासूनगतासूश्चं, नानु शोचन्ति पंण्डिताः "
: मायदेशीच्या पवना आवर आंसू...
जा सखया जा मनोगतीनें
शैलखड्यांना चरणीं चुरडुन,
मैलांचा पाचोळा पिंजून...
—मारुतराया दे ललकारी...
पति झिजतसे जायेसाठीं...
यति झिजतसे जनतेसाठीं...

भरत वाक्य हें भारत नाट्यीं !

—श्रीरंग गुणे

## १४ : ऋतूऋतूंतुन

तुझिया मनांत वसंत होऊन
हरित सौंदर्य मी फुलवावे.
रूसव्यांत कधीं उगीचच द्यावी
दाहकता तुज मी ग्रिष्माची.
झिमझिम सरीं तुज भिजवीत
वर्षा होऊनिया यावे धुंदींत.
स्वप्निल चांदणें तुझिया अंगणी
उधळत यावे शरद् करें.
तुज गारठीत हिम तुषारांत
तनू शहारीत व्हावे हेमंत.
द्वैतपणाची पिकलेली पाने
उधळित जावे शिशिरभ्रमीं.
तुज भेटावया यावेसे वाटे
ऋतुंऋतूंचें लावून पंख.

—बाळ खारे

१५ : संध्यासमयीं

मोहक संध्या पुन्हां न आली
क्षणिक स्मृति ठेवून गेली.
झरली होती श्रावण सर ती
मृद्‌गंधाला होती भरती,
उजळत होती अंधुक पणती
देव्हाऱ्याच्या अगदी पुढती
अस्फुट अस्थिर किणकिण नाजुक
जुळले दोन्हीं कर ते भाविक.
क्षणेक माझे भान हरपलें
काय "याचना" नाहीं कळलें
मला न कळतां मला निरखिलें...
संध्या समयीं अवचित घडलें.
...मंतरलेले ते क्षण गेलें
रंग गुलाबी झिरपत उरलें.

—बाळ खारे.

## १६ : मेघदूता

संग्रहालय ठाणे
९२६५८

अनिलाचें मृदु पंख लावुनी
प्रीतिच्या मधु पंक्ति वेचुनी...
प्रियेकडे तूं जा जा आता
निळया नभा हें मेघदूता!

असेल जर ती शयनीं स्वप्नीं
हळूंच जा तूं श्वासांमधूनी
सांग व्यथा रे, माझी अधिरता...
निळया नभा हें मेघदूता!

अेकांती तिज नसेल सोबत
आठवणीचें ने तूं मधुघट...
जातांना परि ने व्याकुळता
निळया नभा हें मेघदूता!

सांगुन माझी विरह कहाणीं...
जगतो सखिच्या नामस्मरणीं!
शांतवून ये तिची आर्तता
निळया नभा हे मेघदूता!

—सालोमन लुथर मानमोठे

१७ : अमृत

राक्षस भेणें सर्व सुरांनीं
अमृत सांठा उडवुनीया,
अनृत नाही, सत्य सांगतो
तुझ्याच जवळी देऊनिया...
रक्षाया तें तुळा विनविलें.
परंतु तुजला इमान कोठे?
स्वार्थ असा तूं साधियला...
तेंच असे गे अमृत ओठीं
भासतसे ललिते मजला.

—भा. द. कौण्डिण्य

स्वर्ग कवाडे सताड उघडी
युद्धांमधि घे उडी...
अर्जुना, कर आतां तातडी.

क्षत्रिय धर्मा मुकशिल जर, तर
अपकीर्ति तव जाईल दुरवर

पापाची तव भरली वाटे
आजच्च आतां घडी.

कीर्तिला तव कलंक येईल
अैसी भाषा जन तें वदतिल,

अपकीर्ति असते बा रे
मरणाहुनी वावडी.

महारथी तुज म्हणतिल भ्याला
कौरव म्हणतिल षंढ जाहला

तुला पाहतां या पुढती रे
कुणी न घेतील दडी.

समरीं पडतां स्वर्गी जाशिल
विजयी होतां राजा होशिल

युद्ध कराया समोर बघ ही
सुसज्ज सेना खडी.

—भा. द. कौण्डिण्यें

# १९ : ध्येय

मला वाटते पंकज होऊनी
रसिक जनांना रिझवावे,
दुःखामाजी कसें हंसावे
हें सर्वांना शिकवावे.

मला वाटते पवन होऊनी
सुगंध सर्वा अर्पावे.
सुगंध द्यावा, स्वतः सुखावे
सकल जनांनां सुखवावे.

मला वाटते जलद होऊनी
सदा वितानीं विचरावे
जलधारांनीं सिंचन करूनी
भू मातेला नटवावे.

त्याहुनि वाटे माझ्या भंवती
बालक गण हें जमवावे,
ज्ञानामृत हे तया पाजुनी
धन्य स्वतःला मानावे.

—गं. रा. म्हात्रे

याला जीवन ऐसें नांव.

बालपणांतिल सुखद कल्पना
तारुण्यांतिल प्रीत भावना
अन् वृद्धाच्या विकल यातना
भोगून जगतो जीव.

कुणीं वैभवीं लोळत पडतो,
कुणी दैन्यानें पिचून निघतो,
मरणांतुनही जीवन जगतो...
जगण्याची ही हाव.

प्रकाशांत पण मिटती डोळे
तर अंधारीं हितगुज चाले...
संसाराचें चित्र चिमुकलें
नयनीं घेई धांव.

याला जीवन ऐसें नांव!

—व्यंकटेश साळुंके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...... दि: ......
क्रमांक ...... नों दि ......

२१ : समर्पण

चरणावरचें पुष्प तुझ्या मी, नसेल रंग सुगंध.
अर्पियला परि अंतरांतला निर्मळ भावमरंद.
चरणरजांतुन तुझ्या पाझरे अखंड संजीवन
तुझीच मूर्ति मनांत कोरित घेतों पदिं लोळण.
नको कुणाच्या भालावरचें अभिमानाचें स्थान
नको शोभणें कुंतलपाशीं, शवावरीं तोरण.
कधीं न धरिला स्वर्गसुखाचा, इंद्रपदाचा ध्यास
तुझ्या भक्तिविण आणिक कसला नाहीं मज अभिलाष
तुझ्या प्रसादें उज्वल होवो जीवन मातीमोल,
जन्मोजन्मीं तव चरणावर होवो मन्मन फूल.

—यशवन्त पारखी

उंच हिरव्या टेकडीवरती
पसरलेलें क्लान्त गवत
विनवितसे आकाशास
"लुळा झाला प्राण, गळे गात्र–गात्र...
"आकाशाची उंची मापतांना इथे
टांगलेला जीव उडूं पाहे बरी,
कासाविस माती तहानेला प्राण
झिमझिम तुझी ढाळ गा चवरी"

—वा. ना. नेमाडे

## : कसें ?

नुकतेच पाहुनी नभाकडे
चढणार कसें तूं ऊंच कडे ?

सदा वादळे भंवती उठतिल
शिरावरीं ढग कभिन्न जमतिल
मधुनी मधुनी विजा चमकतिल
कां अशामुळें तव मार्ग अडे ?

धुलिकणांनीं दिशा धुंदतिल
क्रूर निराशा धैर्या जाळिल
मनोभंग तव सहृद करतिल
म्हणूनि फिरशील मुळाकडे ?

कडे कपारी दुस्तर गमतिल
कुठे श्वापदे भिती दावतिल
साथीदार तुज कुणी न मिळतिल
कां व्यर्थ पाहशी दुज्याकडे ?

मानु नको तूं स्वतःस दुर्बल
दृष्टी ठेव ध्येयावर निश्चल
सर्व संकटे क्षणीं वितळतिल...
तव गरुड भरारी नभाकडे
तूं टांक पाऊलें पुढेपुढें.

—श्रीनिवास कुलकर्णी

मंद वायुची झुळूक येवुनी
अंग शहारे रोमांचानीं,
तुझ्या नि माझ्या मनीं बहरला
शरद गारवा, भावबितानीं.

तव नयनाच्या कलशामधलीं
सुरा प्राशुनी अधरोष्टांनीं,
धुंद जाहलों- तुझ्याचसाठीं—
धवल धरेला साक्ष ठेवुनीं

शरदाच्या रम्य चांदण्यांतलीं
भेट आपुली पहिली-वहिली,
आठवते कां तुज प्रियंवदे
प्रीत आपुली जगा वेगळी.

—शरद राणे

## : मील

घरघर सारीं यंत्रें करती,
सदैव चाले येथे घर्षण...
परी विसरुनि भेद–अभावा
मनवतेचें येथे मीलन.

हराम म्हणूनि आरामाला
फुकटी सांगे घेतिल सारें,
मील मजुर हा नसें त्यांतला
अर्थाला तो तर सार्थ करी.

मालक होतो गब्बर येथला
( पैसा सारा त्याच्याकरतां )
परि सत्यता त्यांत असे ही...
जीवन येथें लाखो करितां.

—अकबर

निशाचरांच्या भयाण जगतीं
दीप मनींचें नित्य तेवतिल...
विशाल रूपीं विलिन व्हावया
उषःकालची वाट पाहतिल.

—अकबर

२७ : रंग-धनू

रंगधनूचा निळ्या नभाला दीपमालिके परी शोभे,
सप्तजणांचें एकरूप तें रम्य अशा आकाशीं नाचे.
पिवळी प्रियतम झांक प्रियेची कुण्या कवीला त्यांत दिसे
कुणी पाहतो एक दिलाची दुनिया सारीं त्यांत वसे.
निलांगणी त्या नीलवर्णिता नीलाम्बरीची ये साद
निळा निळा तो विशाल डोंगर घुमवित असतो प्रतिसाद.
कुणी समजतो ओठ लाल तें गुलाल उधळी गालावरि
कुणी विरहिणी तृप्त जाहली चुंबूनी अपुली प्रीतखरी.
कुणी यौवना अधिर जाहली लेवून हिरवे कंकण हें
कुणी हंसतसे मनिं शालुचा धरुनी हिरवा अंचल ही.

—नागेश कुळकर्णी

कांस्यामाजी मी उमलेनी
साऱ्या जगतां सुगंध देतो...
मानवहि मज प्रीतिनें
सुखद करानें उरीं धरतो.

मज वाटे धन्य जाहलो
जन्माची तर सार्थकता...
मानवांत असे खरोखर
मंगलता अन् मानवता...

पण...
क्षणभंगूर सुख माझे
क्षणांत गेले नष्ट होउनी...
कोमेजून मी गेलो जेव्हां
मानवानें दिलें फेकुनी...
ज्या करांनीं स्विकृत केलें
त्याच करांनीं दिले फेकूनीं...

स्वार्थी जगाच्या कर्मावरती
पसरो माझी चिमूटभर ही सुकली माती.

—बाबा गावंडे

## २९. : तव कृपाछत्र धरणें

मी अज्ञ
तुम्ही सकळज्ञ
तरी मज सूज्ञ
जगीं या करणें.

मत्पाप
भरोनी माप
उरे जरि, ताप
ना तरी दिधणें

तव दास
जाहला खास
अधिर सेवेस
चाकरी घेणें

तुज शरण
सदा मी दीन
धरीं तव चरण
ना तरी छळणें

मम हांक
ऐकुनी एक
कृपेची भीक...
वास पदीं धरणें

तव कृपा छत्र तें धरतें.

—ना. द. काशीकर

## ३० : परि एकदां भेट देई मला

सखे घेत जावा जिवाचा विसावा तुझ्या गोड छायेत मी नेहमी.
सदा पाझरावा झरा प्रीतिचा गे तयाचा असे ताहनेलाहि मी.
तुझी देखणी हास्य मूर्ति गडे हालवी रंजवी रोज जीवास या.
सखे मोद आमोद वाटे मनाला, तुला पुजितो नित्य चित्तांत या.
हरे भान माझे, तुझे वेड लागे, मला भाससी दिव्य देवांगना
सुचेना रूचेना, खुळा जीव होई, मला मोहिलें तूं प्रिये अंगना.
तुझा ध्यास मजला सखे लागला गे, तुझ्यावीण कोठें न् कांहीं दिसे
सखे सोड बहु गोड कंठातुनि त्या लकेरी मधु प्रेमही अन् तसे.
तुझ्या संगतीचा मला लागला छंद अति गोड जो गे सदा वाटतो
तुझे काढुनी चित्र चित्रांगने मि सुखाच्या समाधीतची गुंगतो
संसार सिंधूत ती टाकियेली, होडी गडे वल्हवूं चल् तिला
जाऊं तरोनी भवसिंधु आतां, परी एकदां भेट देई मला.

—मो. गो. चांदसरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८९५ दि: ३।५
क्रमांक १५५३ नों. दि: १८।८।५

अंधारातील तारका चमकते तेजे जशी लांबुनी
तैसा संकटमार्ग आक्रमिसि तूं आशा मनीं ठेवुनी.
आत्माहूति करी जरी दगड तो, पायांतला पाहणें
नाहीं वाटत मौल्यवान जगतां, खोटे असे मापणें !

दुःखे पावति नाश, पाहुनी तुझ्या डोळ्यांत स्वप्नें खरी
आमोदे मन नाचते बघुनिया आनंद-अश्रू सरी
आशेची फुलतां फुले करुनी मी माला तुला अर्पितो,
अंधःकार सरे, प्रकाश कण तूं, उल्हास कीं वाटतो.

—श्रीराम अट्टावलकर

REFBK-0012758
REFBK-0012758

## ३२ : धुंदी

जमतो घोळका
टोळ भैरवांचा
रात्रं दिवस.

त्यांचा विषय
एकच असतो
गुणगौरव.

गुलगार येतें
हृदयीं नाचतें
चढते मस्ती.

सोमरस हातीं
मैफिल गाते
भिती कुणाची ?

भिती नसे पण
अंग शहारते
दिसते बेडी.

उठते वादळ
क्षणांत पळते
पैशांची धुंदी.

—जगदीशकुमार जाधव

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १२०५८
ग्रंथ शाखा

